SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०२२-२३/ 15 दिनांक : 19/04/2023

## स्मरणपत्र क्रमांक २

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**
(Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांसाठी)

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
वेबपोर्टलवर सन २०२२-२३ या वर्षाची माहिती नोंदणेबाबत....

**संदर्भ : १. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०२२-२३/१३, दि.११/०४/२०२३ रोजीचे स्मरणपत्र क्र. १ व ई-मेल.**
**२. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०२२-२३/१०, दि.२१/०३/२०२३ रोजीचे परिपत्रक व ई-मेल.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडून सन २०२२-२३ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित तसेच Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२२-२३ करिता दिनांक ३० सप्टेंबर,२०२२ हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती एमआयएस वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदरची माहिती अनुक्रमे दि.१०/०४/२०२३ व दि.१५/०४/२०२३ पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेले होते. सदर माहितीचा आढावा घेतला असता बहुतांशी महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर नोंद केलेली दिसुन येत नाही. महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडुन त्वरीत कार्यवाही करून घ्यावी ही विनंती. वेबपोर्टलवर माहिती **दिनांक २०/०४/२०२३** पुर्वी नोंद करून विद्यापीठास सहकार्य करावे.

माहिती वेळेत नोंद न केल्यामुळे आपले महाविद्यालय **माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS) या वेबपोर्टलवरून De-affiliate होईल.** आपले महाविद्यालय De-affiliate झाल्यास या अनुषंगाने **आपल्या महाविद्यालयाशी निगडीत विद्यापीठातील, विभागीय सहसंचालक कार्यालयातील तसेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबतचे कोणतेही काम करता येणार नाही.** आपले महाविद्यालय (DHE-MIS) या वेबपोर्टलवरून De-affiliate झाल्यामुळे उद्भवना-या अडचणीस व पुढील सर्व कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया नोंद घ्यावी. **सदरचे स्मरणपत्र ज्या महाविद्यालयांनी माहिती नोंद केलेली आहे अशा महाविद्यालयांना लागु नाही.** महाविद्यालयांनी माहिती नोंद केली असल्यास व प्रमाणपत्र पाठविले नसल्यास सदरच्या महाविद्यालयांनी प्रमाणपत्र तात्काळ पाठवून देण्यात यावे.

**एमआयएस वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**प्र-कुलसचिव**